# हिंसामुक्त जगण्यासाठी स्त्रीवादी चळवळ महत्त्वपूर्ण

## शारदा साठे : शिवाजी विद्यापीठात स्त्रीमुक्ती परिषद, चळवळीला पन्नास वर्षे पूर्ण

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २९ : 'हिंसामुक्त व शांततामय वातावरणात जगण्याच्या अधिकारासाठी स्त्रीवादी चळवळ महत्त्वाची भूमिका बजावेल', असा विश्वास मुंबईतील स्त्रीमुक्ती संघटनेच्या विश्वस्त शारदा साठे यांनी आज येथे व्यक्त केला.**

स्त्रीमुक्ती चळवळीला पन्नास वर्षे पूर्ण झाल्याबद्दल शिवाजी विद्यापीठाच्या शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन व महाराष्ट्र स्त्रीमुक्ती संघटनेतर्फे आयोजित कोल्हापूर जिल्हा स्त्रीमुक्ती परिषदेत त्या बोलत होत्या. राजर्षी शाहू सभागृहात त्याचे आयोजन केले होते.

शारदा साठे म्हणाल्या, 'शोषणविरहित व मानवतापूर्ण जगासाठी स्त्रीवादी चळवळीची आजच्या काळात मोठी आवश्यकता आहे. या चळवळींत आलेला विस्कळीतपणा व त्यांचे झालेले 'एनजीओ'करण यामुळे चळवळ नकारात्मक अर्थाने प्रभावित झाली. त्यानंतर मात्र स्त्रियांच्या संदर्भात विविध स्तरांवरील सुरक्षा तपासणीच्या निमित्ताने पुन्हा चळवळीत जी गतिमानता आली, तिला जो प्रतिसाद मिळाला, त्यातून एक नवी उभारी प्राप्त झाली. यापुढे बदलत्या परिप्रेक्ष्यात स्त्रीमुक्ती चळवळीचे पुनर्गठण करण्याच्या दिशेने वाटचाल करावी लागेल. या निमित्ताने एकवटलेली स्त्रियांची ताकद समन्वयाच्या जगाच्या नवनिर्माणासाठी वापरायची आहे. चळवळीच्या कार्याचे विकृतीकरण टाळण्यासाठी तिचे दस्तऐवजीकरण करणे गरजेचे आहे.'

परिषदेच्या समन्वयक छाया राजे म्हणाल्या, 'स्त्रीमुक्ती चळवळीने राज्यात 'एकला चलो रे'पासून 'मिल के चलो रे' असा खूप चांगला समन्वयाचा सांघिक प्रवास केला आहे. स्त्रियांच्या हक्कांसाठी वेगवेगळ्या स्तरांवर कार्यरत संघटनांना एकत्र आणण्यात पन्नास वर्षांच्या वाटचालीत आलेले यश महत्त्वाचे आहे.'

यावेळी अमोल केरकर, तनुजा शिपूरकर, सीमा पाटील उपस्थित होत्या. अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. रेश्मा खाडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रीती देसाई यांनी आभार मानले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शनिवारी आयोजित स्त्रीमुक्ती परिषदेत बोलताना शारदा साठे. शेजारी डावीकडून डॉ. भारती पाटील, अमोल केरकर.

### 'स्त्री-पुरुष समानतेच्या दिशेने'वर चर्चा

**■ परिषदेत 'स्त्री-पुरुष समानतेच्या दिशेने' विषयावर चर्चा झाली. मांजी प्र-कुलगुरू डॉ. माया पंडित, डॉ. भारती पाटील यांनी त्यात सहभाग घेतला. 'पुरुषभान' विषयावर मिलिंद चव्हाण (पुणे) व प्रसाद कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. 'हिंसाचार : मानसिक, सामाजिक' विषयावरील सत्रात तनुजा शिपूरकर, मयुरी आळवेकर, सुनीता पाटील, शोभा कोकीतकर (मुंबई) सहभागी झाल्या. सुधाकर भदरगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या 'स्त्रिया व अंधश्रद्धा' विषयावरील विशेष सत्रात कोल्हापूर अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने 'ऐसे कैसे झाले भोंदू?' विषयावर नाटिका, बतावणीचे सादरीकरण झाले.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

3 0 NOV 2025

पुण्यनगरी

# शोषणविरहित जगासाठी स्त्रीवादी चळवळीची आवश्यकता

## शारदा साठे; शिवाजी विद्यापीठात स्त्रीमुक्ती परिषदेला प्रतिसाद



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित स्त्रीमुक्ती परिषदेत बीजभाषण करताना शारदा साठे. मंचावर डॉ. भारती पाटील आणि अमोल केरकर.

कोल्हापूर : प्रतिनिधी

शोषणविरहित आणि मानवतापूर्ण जगासाठी स्त्रीवादी चळवळीची आजच्या काळातही मोठी आवश्यकता आहे, असे प्रतिपादन मुंबईच्या स्त्रीमुक्ती संघटनेच्या विश्वस्त शारदा साठे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचे शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन आणि महाराष्ट्र स्त्रीमुक्ती संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने स्त्रीमुक्ती चळवळीला ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आयोजित एकदिवसीय परिषदेच्या उद्घाटन समारंभात बीजभाषक म्हणून त्या बोलत होत्या.

साठे म्हणाल्या, स्त्रियांच्या चळवळीत झालेले विस्कळीकरण व त्यांचे मोठ्या प्रमाणात झालेले 'एनजीओ'करण यामुळे स्त्री चळवळ नकारात्मक अर्थाने प्रभावित झाली; मात्र स्त्रियांसंदर्भात विविध स्तरांवरील सुरक्षा तपासणीच्या निमित्ताने पुन्हा चळवळीमध्ये जी गतिमानता आली, तिला स्त्रियांचा जो प्रतिसाद लाभला, त्यामुळे एक नवी उभारी प्राप्त झाली. नव्या बदलत्या परिप्रेक्ष्यात स्त्रीमुक्ती चळवळीचे पुनर्गठण करण्याच्या दिशेने यापुढील वाटचाल करावी लागणार आहे. हिंसामुक्त, शांततामय वातावरणात जगण्याच्या अधिकारासाठी स्त्रीवादी चळवळ महत्त्वाची भूमिका बजावेल. या निमित्ताने एकवटलेली स्त्रियांची ताकद आता नवीन सुंदर, समन्वयाच्या जगाच्या नवनिर्माणासाठी वापरायची आहे. चळवळीच्या कार्यांचे विकृतीकरण टाळायचे असल्यास तिचे योग्य दस्तावेजीकरण करण्याची आवश्यकताही आहे.

परिषदेच्या समन्वयक छाया राजे म्हणाल्या, स्त्रीमुक्ती चळवळीने राज्यात 'एकला चलो रे'पासून 'मिल के चलो रे' असा खूप चांगला समन्वयाचा सांघिक प्रवास केला आहे. स्त्रियांच्या हक्कांसाठी वेगवेगळ्या स्तरांवर कार्यरत संघटनांना एकत्र आणण्यात गेल्या ५० वर्षांच्या वाटचालीत आलेले यश महत्त्वाचे आहे. आता पुढील ५० वर्षांच्या वाटचालीची दिशाही आपण संघटितपणानेच ठरवली पाहिजे. अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक, रेश्मा खाडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रीती सरदेसाई यांनी आभार मानले. यावेळी अमोल केरकर उपस्थित होत्या. तनुजा शिपूरकर, सीमा पाटील यांच्यासह विविध संस्था, संघटनांच्या पदाधिकारी, महिला सदस्य, शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

### स्त्रीवादी चळवळीविषयी विविध सत्रांत चर्चा

'स्त्री-पुरुष समानतेच्या दिशेने' या विषयावरील सत्रात माजी प्र-कुलगुरू डॉ. माया पंडित, डॉ. भारती पाटील यांनी सहभाग घेतला. मुंबईच्या अमोल केरकर अध्यक्षस्थानी होत्या. 'पुरुषभान' या विषयावरील सत्रात मिलिंद चव्हाण (पुणे) आणि प्रसाद कुलकर्णी यांनी सहभाग घेतला. 'हिंसाचार : मानसिक, सामाजिक' या विषयावरील सत्रात तनुजा शिपूरकर, मयुरी आळवेकर, सुनीता पाटील यांनी सहभाग घेतला. शोभा कोकीतकर (मुंबई) अध्यक्षस्थानी होत्या. सुधाकर भदरगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या 'स्त्रिया व अंधश्रद्धा' या विषयावरील विशेष सत्रात अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने 'ऐसे कैसे झाले भोंदू?' या विषयावर नाटिका, बतावणीचे सादरीकरण करण्यात आले.

30 NOV 2025
तरुण भारत

# विद्यापीठाच्या ६० अभ्यासक्रमांची परीक्षा संपन्न, ४९ निकाल जाहीर

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२५ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे सुरू आहेत. शनिवारपासून बी. ए., बी. कॉम, बी.सी.ए, बी.बी.ए, बी. आर्च, एम. एस्सी, एम.सी.ए, एम. ए, बॅचलर ऑफ लॉ, बी.आय.डी, एम.एस. डब्लू, बी. जे, एम. आर. एस, एम.बी.ए, बी.डी. एफ, सी, अशा विविध ६० अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने राज्यातील १७८ परीक्षा केंद्रांवर सुरळीत पार पडल्या.

आजच्या परीक्षांसाठी एकूण २५ हजार ९३ विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, विद्यापीठाने बी. सी. डब्लू, सेम वन, सेकंड (कोर्स कोड ११८९४), बी. सी. डब्लू, सेम, व्ही, अॅन्ड व्हीआय, (कोर्स कोड ११६२०) लेमेसने, बी.एस. डब्लू व्ही (कोर्स कोड ११२०) या पाच अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले असून, आजअखेर एकूण ४९ अभ्यासक्रमांचे निकाल प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

■ कोल्हापुरात १२ तर सातान्यात १ गैरप्रकार

दरम्यान, विद्यापीठाने स्थापन केलेल्या भरारी पथकांनी कोल्हापूर जिल्ह्यात १२, सातान्यात १ अशा एकूण १३ गैरप्रकारांच्या नोंदी परीक्षा प्रमाद समितीतर्फे केल्या आहेत. सांगली जिल्ह्यात कोणताही गैरप्रकार नोंदवला गेला नाही. परीक्षेचे पावित्र्य अबाधित राहावे यासाठी सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालकांनी केले आहे.

30 NOV 2025

पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या ४९ अभ्यासक्रमांचे निकाल

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. यामध्ये शनिवारी विविध ६० अभ्यासक्रमांच्या परीक्षा विविध १७८ परीक्षा केंद्रांवर झाल्या. दिवसभरात ५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले असून, ४९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले आहेत. शनिवारी झालेल्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी २५ हजार ९३ विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, भरारी पथकांकडून कोल्हापूर जिल्ह्यात १२ आणि सातारा जिल्ह्यातून १ अशा १३ गैरप्रकारांची नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत केली आहे.

जनसंपर्क कक्ष
30 NOV 2025 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाकडून आजअखेर ४९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील आजअखेर ४९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. शनिवारी बीए, बीकॉम, बीसीए, बीबीए, एमएस्सी, एमसीए, बीआयडी, बीजे, एमआरएस, बीडीएफसी आदी ६० अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने १७८ केंद्रांवर झाल्या. दरम्यान, दि. २९ रोजी बीएसडब्ल्यू अभ्यासक्रमाच्या विविध सत्रांचे निकाल जाहीर झाले. परीक्षेसाठी नेमलेल्या भरारी पथकांकडून कोल्हापूर (१२), सातारा (१) अशा एकूण १३ गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत केल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

3 0 NOV 2025
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ संघाला 'खेलो इंडिया' स्पर्धेत कांस्य

**वारणानगर :** राजस्थान येथे घेण्यात आलेल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स स्पर्धेमध्ये दहा मीटर एअर रायफल मेन प्रकारात शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघाने घवघवीत यश संपादन करताना सांघिक कांस्यपदक पटकावले.



■ **खेलो इंडिया गेम्स स्पर्धेत कांस्यपदक मिळवलेला खेळाडू प्रतीक जोंग**

छत्रपती राजाराम टिंबर मार्केट येथील ऑलिंपिक टार्गेट शूटिंग रेंजचा खेळाडू प्रतिक आनंदा जोंग याने रणवीर काटकर व अथर्व पाटील यांच्या साथीने शिवाजी विद्यापीठाने सांघिक कांस्यपदकावर आपल्या नावाचा शिक्का उमटवला. विद्यापीठाच्या या संघातील खेळाडूंना प्रशिक्षक विनय पाटील, सुहास जगदाळे, वीणा पाटील, तसेच तालुका क्रीडा अधिकारी सचिन चव्हाण व पालकांचे मार्गदर्शन लाभले. तसेच कोल्हापूर जिल्हा रायफल असोसिएशनचे प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

30 NOV 2025

सकाळ

# आदिती, गीतांजलीला खेलो इंडिया स्पर्धेत सुवर्ण

जयपूर, ता. २९ : खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेत तिरंदाजीत विश्वविजेत्या आदिती स्वामीने सोनेरी वेध घेत घेतला. वेटलिफ्टिंगमध्ये गीतांजली जगदाळेने सुवर्ण, वैष्णवी पवारने रौप्यपदक पटकावले. भक्ती वाडकरने चार पदकांची लयलूट केली आहे तर पाटीलने ज्युदोत ब्राँझपदकाची कमाई करीत दिवस गाजविला.

खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेत पुणे, शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंची विजयी घोडदौड कायम आहे. या यशात महाराष्ट्राची मुलींनी पदकाची बाजी मारली आहे. शिवाजी विद्यापीठाकडून खेळताना अपेक्षेप्रमाणे आदिती स्वामीने कंपाउंड महिला वैयक्तिक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. वैयक्तिक अंतिम फेरीत १९ वर्षीय अदितीने लवली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या तनिपर्ती चिकिथाला १४७-१४३ असा पराभव करून आपली हुकूमत दाखवून दिली.

वेटलिफ्टिंगमधील ६३ किलो वजनगटात १६७ किलो वजन उचलून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गीतांजली जगदाळे सुवर्णपदकाला गवसणी घातली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या दीक्षा यादवने १५०० मीटर फ्रीस्टाइलमध्ये रौप्य, २०० मीटर फ्रीस्टाइल, ८०० मीटर फ्रीस्टाइल, फ्रीस्टाइल व मिडले रिले शर्यतीत ब्राँझ अशी पाच पदके जिंकण्याचा पराक्रम केला आहे. भक्ती वाडकरनेही एक रौप्य, तीन ब्राँझपदके मिळवली.

3 0 NOV 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज






# खेलो इंडिया यूनिवर्सिटी गेम्स स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या आदिती स्वामी हिला कंपाऊंड आर्चरीमध्ये सुवर्णपदक

**कोल्हापूर (महा न्यूज अँण्ड व्ह्यूज):**

शिवाजी विद्यापीठाची पदकांची आजची संख्या एकूण तीन त्यामध्ये आदिती स्वामी महिला कंपाउंड वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक तर जूडो महिला स्पर्धेत ७८ प्लस वजनी गटात कुमारी संस्कृती पाटील हीच कांस्य पदक आणि सायकलिंग मध्ये ट्रॅक टाइम ट्राइल प्रकारात सायली आरंडे हिला कांस्य पदक प्राप्त झाले.







आज अखेर शिवाजी विद्यापीठाने एकूण पद तालिकेमध्ये दोन गोल्ड दोन सिल्वर व पाच ब्रांच मेडल असे एकूण नऊ मेडल मिळवलेले आहेत. उद्या शूटिंग व साइक्लिंगच्या स्पर्धांमध्ये विद्यापीठाचे खेळाडू सहभागी होणार आहेत. कनोइंग कायकिंग आणि मैदानी स्पर्धा १ तारखेपासून सुरु होणार आहेत.

विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी प्रभारी प्र कुलगुरू डॉ. ज्योती जाधव कुलसचिव डॉ. व्ही एन शिंदे क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे पथक प्रमुख डॉ. एन डी पाटील यांचे प्रोत्साहन व सर्व सहभागी प्रशिक्षक संघ व्यवस्थापक यांचे खेळाडूंना मार्गदर्शन लाभत आहे.

30 NOV 2025
लोकमत

# खेलो इंडियात भक्तीचा चौकार, संस्कृतीला कांस्य

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राजस्थान येथे सुरू असलेल्या पाचव्या



खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेत मुलींनी बाजी मारली. स्पर्धेत पुणे आणि शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंची विजयी घोडदौड कायम आहे. ज्युदो, जलतरण स्पर्धेत भक्ती वाडकर, संस्कृती पाटील यांनी पदके पटकाविली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून खेळताना कोल्हापूरच्या भक्ती वाडकरने ४ पदकांची लयलूट केली. त्यात १ रौप्य, ३ कांस्यपदकाचा समावेश आहे. तिने ५० मीटर बॅकस्ट्रोकमध्ये यश मिळविल्यानंतर २०० मीटर बॅकस्ट्रोक, फ्रीस्टाईल, मिडले रिले शर्यतीत कांस्यपदक पटकाविले. तिचे वडील राहुल वाडकर राधानगरी शासकीय धान्य गोदाम हमालाची नोकरी करतात. शिवाजी विद्यापीठाच्या संस्कृती पाटीलने ज्युदोतील महिलांच्या ७८ किलो वजनी गटात कांस्यपदक पटकाविले. दोन लढतीत गुजरात, पंजाबच्या खेळाडूंचा पराभव करीत उपांत्य फेरी गाठली. कांस्यपदकाच्या लढतीत चंडीगडच्या अनूला पराभूत केले.

30 NOV 2025

पुण्यनगरी

# सुहाना जमादारची 'खेलो इंडिया 'साठी निवड



**कागल :** जयपूर (राजस्थान) येथे सुरू असलेल्या ५ व्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्ससाठी डी. आर. माने महाविद्यालयाची खेळाडू सुहाना जमादार हिची शिवाजी विद्यापीठ कयाकिंग महिला संघात निवड झाली. सुहाना सांघिक कयाकिंग के-४ क्रीडा प्रकारात २०० मी. व १००० मी. या स्पर्धेत सहभागी होणार आहे. या स्पर्धा दि. १ डिसेंबरपासून जयपूर येथे होणार आहेत. तिला संस्थेचे सचिव प्रताप माने, कॅम्पस डायरेक्टर डॉ. प्रवीण चौगले, प्राचार्य डॉ. नंदकुमार कदम यांचे प्रोत्साहन, तर शारीरिक शिक्षण संचालक डॉ. श्रीनिवास पाटील, प्रा. संग्राम तोडकर यांचे मार्गदर्शन लाभले.